## प्रास्ताविक

"कोल्हापूर संस्थानच्या सामाजिक व राजकीय चळवळीचा एक अभ्यास इ.स. १९२२ ते १९४०" हा शोधप्रबंध मी, एम्.फिल्. (इतिहास) या डिग्रीसाठी विद्यापीठास सादर करीत आहे. हा विषय निवडण्याचे प्रमुख कारण म्हणजे आजअखेर १९२२ पर्यंतचा कोल्हापूर संस्थानचा इतिहास अनेकजनांकडून लिहिला गेला आहे. शाहू महाराजांवर अनेकांनी आपले शोध प्रबंध सादर केले आहेत. तसेच त्यांचे चरित्रही अनेक मान्यवर चरित्र लेखकांनी लिहिले आहे. परंतु शाहू महाराजांच्या मृत्युनंतरच्या कालखंडाचा म्हणजेच छ. राजाराम महाराजांच्या कालखंडाचा इतिहास आजअखेर सविस्तरपणे लिहिला गेला नाही. शाहू महाराजांनी केलेल्या कार्याची अंमलबजावणी पुढच्या काळात झाली किंवा नाही याचा अभ्यास करण्याची गरज होती. शिवाय छ. राजाराम महाराजांचे जीवन कार्य या अभ्यासाच्या निमित्ताने मांडता येणार होते म्हणून मी हा अगदीच नवा असलेला विषय निवडला. या विषयावर आजअखेर लिखान झालेले आढळले नाही. त्यामुळे मुळ कागद पत्रेच पाहणे गरजेचे होते. म्हणून तत्कालिन नियतकालिके, ॲडमिनिस्ट्रटिव्ह रिपोर्ट व त्या काळात प्रसिध्द झालेली काही माहितीवजा पुस्तके गोळा करण्याचा प्रयत्न केला व या प्रबंधासाठी लागणारी साधनसामुग्री जमा केली.

माझे मार्गदर्शक डॉ. एम्.डी. नलावडे यांनी योग्य मार्गदर्शन व उत्तेजन देऊन मी संकलित केलेली माहिती व टिपणे पाहून त्यामध्ये उपयुक्त भर पडेल असे आणखिन संदर्भ व माहिती मिळवून दिली त्यामुळे हा प्रबंध मूर्त स्वरुपात येऊ शकला.

सदर प्रबंधासाठी माझे मार्गदर्शक डॉ. एम्.डी. नलावडे यांचे बहुमोल मार्गदर्शन झालेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय हे काम होणे अशक्य

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

होते. तसेच या विषयाच्या संदर्भात आमच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. बी.आर. कांबळे, डॉ. व्ही.एस्. कदम, डॉ. अरुण भोसले, डॉ. बी.डी. खणे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक डॉ. विलास संगवे यानीही मला विषयाच्या संदर्भात माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला. राजाराम कॉलेजचे ग्रंथपाल श्री. गोळवलकर व साहाय्यक श्री. बी.डी. पाटील यांनी कोल्हापूर ॲडमिनिस्ट्रेशन रिपोर्ट उपलब्ध करुन दिले तसेच दै. सत्यवादीचे संपादक विजय पाटील यांनी सत्यवादीच्या जुन्या फाईल्स उपलब्ध करुन दिल्या. म्हणून हे काम करता आले.

तसेच कोल्हापूरचे स्वातंत्र्य सैनिक साथी आण्णा द. चव्हाण यांनी मला कोल्हापूरच्या राजकीय चळवळीबद्दल अनेक साधने मिळवून दिली व त्यामुळे कोल्हापूरच्या राजकीय चळवळीची योग्य व सत्य माहिती मला मिळविता आली.

माझे मित्र डॉ. भालबा विभूते, प्रा. देविदास पवार, प्रभाकर गाडीवान, आनंदराव खोराटे यांनी वेळोवेळी या कामात मला मदत केली आहे. या सर्वांचा मी, त्यांनी मला दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल व सहकार्याबद्दल फार आभारी आहे.

टी. अेस्. पाटील.

.....